# एमएमआरसी करणार २०,९०० झाडांचे नॅशनल पार्कमध्ये वृक्षारोपण

**मुंबई, प्रतिनिधी** - संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात एमएमआरसी २०,९०० वृक्षारोपण करून त्या रोपांची ७ वर्ष देखभाल करणार आहे. अशा सामंजस्य करारावर एमएमआरसीने स्वाक्षरी केली. वृक्षप्राधिकरणाने दिलेल्या परवानगीनुसार या वृक्षारोपणासाठी १९ हेक्टर जमीन वापरण्यात येईल. एमएमआरसी चा हा उपक्रम संयुक्त सामाजिक दायित्वांतर्गत आहे. वृक्षतोडीची भरपाई म्हणून १०,४५० झाडे आणि उर्वरित झाडे सामाजिक दायित्व अंतर्गत लावण्यात येणार आहेत.